28/06/07 Herald

# Steering them towards bright career




**Experts at Sakaal's 'Planning your career after 10th and 12th' (from *left*) Prof Vijay Navle, Vivek Velankar, Dr Pradeep Bavdekar, Deepak Shikarpur, Prachi Javdekar and Vijay Geet**

BY A STAFF REPORTER
*reporters@sakaherald.com*

**TILAK ROAD:** There was an overwhelming response to the ' Planning your Career after 10th and 12th' organised by Sakaal in association with MITCON and Sahil group at Tilak Smarak Mandir on Wednesday. Noted career counsellors, professionals and experts from education and other fields counselled students about making right career decisions.

Experts pointed out opportunities in arts, commerce, hotel management, nursing, journalism, and paramedical courses.

The speakers spoke on the topics - While choosing your career, Career options in Arts and commerce, Professional courses, Careers in IT and Opportunities in Technical Education.

Prachi Javdekar said, "Every student should choose a career according to their aptitude. Knowledge alone cannot be the key for success; it needs thinking, decision-making abilities and positive attitude."

IT expert Deepak Shikarpur highlighted the benefits of language and communication skills along with technical know how.

Social activist and career counsellor Vivek Velankar talked about different professional courses. He focused on the opportunities in paramedical courses like nursing, occupational therapy and speech therapy.

सकाळ

# 'आयटी'च्या विद्यार्थ्यांनी 'बायोडाटा' प्रभावी करावा

**मांजरी, ता. २८ :** संगणकप्रणाली क्षेत्रात सध्या मोठ्या प्रमाणात संधी निर्माण झाल्या आहेत. मात्र, त्यामध्ये यशस्वी भरारी घेण्यासाठी संगणक तंत्रज्ञानाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपला 'बायोडाटा' अधिक प्रभावी करावा, असे मत प्रसिद्ध संगणकतज्ज्ञ विवेक वेलणकर यांनी व्यक्त केले.

येथील अण्णासाहेब आवटे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या 'ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट' विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी श्री. वेलणकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते.

प्रशिक्षण अधिकारी व करिअर मार्गदर्शक प्रा. विजय नवले, प्राचार्य डॉ. के. आर. हरणे या वेळी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या विविध समस्यांचे निरसन श्री. वेलणकर यांनी या वेळी केले.

अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी पहिल्या वर्षापासूनच आपली गुणात्मकता टिकवून ठेवली पाहिजे, असे सांगून वेलणकर पुढे म्हणाले, की संगणकप्रणालीमध्ये काम करण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच इंग्रजीसह विविध परकीय भाषांचे ज्ञानही मिळविणे आवश्यक आहे. याशिवाय मुलाखतीच्या सर्व तंत्रावर भरपूर मेहनतही घेतली पाहिजे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रतिका कौल व अमित रघुवंशी यांनी केले, तर प्रा. नवले यांनी आभार मानले.

२९/०८/०७

## अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचे शंकानिरसन

ओझर (प्रतिनिधी) : 'श्री क्षेत्र ओझर' (ता. जुन्नर, जि. पुणे) येथील रहिवासी विजय नवले यांची शुक्रवारी (दि.१६) दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर 'अभियांत्रिकी अभ्यास कौशल्य' या विषयावर प्रकट मुलाखत होणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी अभ्यासक्रमाविषयी शंका असेल त्यांनी कार्यक्रमाच्या वेळी प्रा. विजय नवले यांना प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करु शकता.